# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.:२०२५६२१३४६
Website:www.unipune.ac.in

Board of Examinations & Evaluatic
Ganeshkhind,Pune-411007
Phone: 2025621346
E-mail: coe@unipune.ac.in


संदर्भ : परीक्षा/एसअँण्डटी/७२८५

दिनांक : 02/02/2021

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, नगर व नाशिक जिल्हा,

**विषय :-** मार्च / एप्रिल, २०२० परीक्षेचे निकाल घोषित झाल्यानंतर होणाऱ्या अंतर्गत गुणांबाबत...
**संदर्भ :-** परिपत्रक २१७/२०२० दिनांक २८ जुलै, २०२०.

महोदय / महोदया,

मार्च / एप्रिल २०२० च्या परीक्षेपासून निकाल घोषित झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या अंतर्गत गुणांसंदर्भातील नियमावली व कार्यपध्दती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने परिपत्रक क्र. २१७/२०२० अन्वये दिनांक २८ जुलै, २०२० रोजी प्रसिध्द केले आहेत.

सदर परिपत्रकामध्ये अंतर्गत गुणांमधील दुरुस्तीसाठीचे विनंती अर्ज किती कालावधीपर्यंत विद्यापीठाकडे सादर करण्यात यावे याबाबतचा कालावधी नमूद करण्यात आला नसल्याने सदर दुरुस्तीबाबतचे विनंती अर्ज हे निकाल जाहीर झाल्यावर बराच कालावधी उलटून गेल्यावर किंबहुना, पुढील सत्र परीक्षेचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाल्यावरसुध्दा प्राप्त होत आहेत आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचे निकाल सुधारित होत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या पुढील परीक्षाच्या परीक्षा अर्जामध्ये विसंगती निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

तरी यासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, मार्च / एप्रिल २०२० सत्राच्या परीक्षेसाठी अंतर्गत गुणांमध्ये परिपत्रक क्र. २१७/२०२० नुसार दुरुस्ती अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत ही मंगळवार, दिनांक ९ फेब्रुवारी, २०२१ अशी राहील. त्यानंतर मार्च / एप्रिल, २०२० च्या सत्र परीक्षेचे अंतर्गत गुण दुरुस्तीसंबंधीचे कोणतेही अर्ज स्वीकारण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

प्रा. शिंदे
श्री. पोटघन
3/2/2021

आपला,
(श्री.महेश काकडे)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

BBA/BCA/D/2020/Letter-1


NEW LAW COLLEGE
AHMEDNAGAR
Inward No. 419

PRINCIPAL
NEW LAW COLLEGE
AHMEDNAGAR